# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २५०/२०२४** **दिनांक-०२/०७/२०२४**

## "अंडरवर्ल्डशी संबंध असलेल्या १५ आरोपीतांच्या आंतरराज्यीय टोळीला अटक करून सुमारे ३२७ करोड ८० लाख रु. किंमतीचे एम.डी. मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ, व ते बनविण्यासाठी लागणारे केमीकल्स परराज्यातील विविध ठिकाणी छापा कारवाई करून जप्त करण्यात गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा यांना यश."

दिनांक १५/०५/२०२४ रोजी गुन्हे शाखा कक्ष ०१, काशिमिरा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, दोन इसम हे त्यांच्या ताब्यातील एम.एच.-४८-डी.-११०१ या नंबरच्या राखाडी रंगाच्या गाडीमधुन ठाणे-घोडबंदर मार्गे मिरा भाईंदर परिसरात विक्री करण्यासाठी एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ घेउन येणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने व्दारका हॉटेल, चेना गाव येथे मे महिण्यात सुरु असलेल्या लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने नाकाबंदी करीत असताना नाकाबंदी दरम्यान मिळालेल्या माहीतीप्रमाणेची गाडी मिळुन आल्याने सदर वाहनात बसलेले इसम १) शोएब हनीफ मेमन,रा.वसई व २) निकोलस लिओफ्रेड टायटस,रा.वसई यांची झडती घेता त्यांचे ताब्यात एकुण १००० ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करून त्यांचेविरुध्द काशीगांव पो.स्टे गुन्हा रजि.नं ११०/२०२४, एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(सी), २२(सी), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यानंतर तपासामध्ये आरोपीत शोएब याने दिलेल्या माहिती वरून आरोपी नामे ३) दयानंद ऊर्फ दया माणिक मुद्दनार रा.वसई मुळ रा. हैद्राबाद व ४) नासीर ऊर्फ बाबा जानेमियॉ शेख हैद्राबाद राज्य-तेलंगणा यांना दि.१७/०५/२०२४ रोजी राजेंद्रनगर, सायबराबाद राज्य तेलंगणा येथे ताब्यात घेवुन अटक करून आरोपी दयानंद ऊर्फ दया याची एम.डी. (मेफेड्रॉन) बनविण्याची फॅक्टरी नरसापुर, मंडळ मारपल्ली, जिल्हा विकाराबाद, राज्य तेलंगणा येथे छापा टाकुन त्यामधुन १०३ ग्रॅम एम.डी पावडर, २५ करोड रु किंमतीचे २५ किलो टु-ब्रुमो केमीकल व एम.डी बनविण्यासाठी लागणारे इतर साहीत्य जप्त केले आहे.

त्यानंतर आरोपी दयानंद ऊर्फ दया याने दिलेल्या माहितीप्रमाणे आरोपी ५) घनश्याम रामराज सरोज रा. जौनपुर, उत्तरप्रदेश यास वाराणसी येथुन ताब्यात घेवुन अटक केले व ६) मोहम्मद शकील मोहम्मद मोईन रा. हैद्राबाद राज्य-तेलंगणा यास गोरेगांव, पुर्व, मुंबई येथे स्विफ्ट कार क्रमांक एमएच/०३/ए.एम/९३२२ सह ताब्यात घेतले व त्याचेकडील स्विफ्ट कारमध्ये ७१.९० ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने सदरचा एम.डी व स्विफ्ट कार जप्त केली आहे.

तसेच आरोपी दयानंद ऊर्फ दया याने दिलेल्या माहितीप्रमाणे आरोपी ७) भरत ऊर्फ बाबु सिध्देश्वर जाधव रा. वाशींद,शहापुर जि.ठाणे यास गणेशपुरी येथुन दि.२७/०५/२०२४ रोजी ताब्यात घेवुन त्याचेकडुन तो राहत असलेल्या लाप बुद्रुक, पडघा, जि-ठाणे येथील राहते घरातुन ५३,७१०/- रुपयाचे एम.डी बनविण्यासाठी लागणारे साहीत्य, व केमिकल्स जप्त केली आहेत.

त्यानंतर तपासामध्ये एम.डी बनविण्यासाठी लागणारे पैसे व एम डी विकुन मिळालेले पैसे याची देवाण घेवाण पाहीजे आरोपी सलीम डोळा रा.मुंबई हा आरोपी ८) झुल्फीकार ऊर्फ मुर्तझा मोहसीन कोठारी रा. सुरत राज्य- गुजरात याचे मार्फत करीत असल्याचे तपासात निष्पंन्न झाल्याने त्याचा शोध घेवुन दि.३१/०५/२०२४ रोजी त्यास सुरत गुजरात येथुन ताब्यात घेवुन त्यास सलीम डोळा याने पाठविलेले १०,८४,०००/- रु रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच काही रक्कम मुंबई येथील अंगडीया(हवाला) यांचेमार्फत पाठवित असल्याचे तपासात निष्पंन्न झाल्याने इसम नामे मुस्तफा युसुफभाई फर्निचरवाला व्यवसाय- अंगडीया, व हुसैन मुस्तफा फर्निचरवाला दोंन्ही रा. भेंडी बाजार, मुंबई यांचे ताब्यातुन पाहीजे आरोपी सलीम डोळा याने पाठविलेले ६,८०,२०० रुपये रोख जप्त केली आहे.

त्यानंतर तपासात मढियाहु जि.जौनपुर येथे पाहीजे आरोपी सलीम डोळा व अटक आरोपी दयानंद मुददनार याचे साथीदार नामे अमिर तौफीक खान रा.वसई मुळ रा. आजमगड, उत्तरप्रदेश व त्याचा भाउ बाबू तौफीक खान हे त्यांचे साथीदार व इतर लोकांमार्फत एम डी बनविण्याचे युनिट चालवित असल्याचे निष्पंन्न झाले वरुन आरोपी ९) बाबू तौफीक खान रा.वसई मुळ रा. आजमगड, उत्तरप्रदेश १०) मोहम्मद नदीम मोहम्मद शफिक खान रा. वसई मुळ रा. आजमगड उत्तरप्रदेश व ११) एहमद शाह फैसल शफीक आझमी रा. भिवंडी मुळ रा. आजमगड, उत्तरप्रदेश यांना अटक करुन त्यांनी दिलेल्या माहीतीप्रमाणे एम.डी बनविण्यासाठी लागणारे साहीत्य, ३०० किलो वजनाचे १२ टु- ब्रुमो केमिकलचे ड्रम ३०० करोड किंमतीचे (आंतराष्ट्रीय बाजारभाव प्रमाणे) जप्त केले आहेत.

सदर गुन्हयातील आरोपी १२) अमिर तौफीक खान १३) मोहम्मद शादाब मोहम्मद शमशाद खान १४) अलोक विरेंद्र सिंह, सर्व रा. आजमगड, उत्तरप्रदेश यांना दि. २५/०६/२०२४ रोजी लखनऊ (यु.पी.) येथुन अटक अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील आरोपी अमिर तौफीक खान याने दिलेल्या माहीतीप्रमाणे आरोपी १५) अभिषेक उुर्फ शुभम नरेंद्रप्रताप सिंह रा. नालासोपारा मुळ रा. जौनपुर, उत्तरप्रदेश यास दि.०१/०७/२०२४ रोजी नालासोपारा येथुन अटक करुन त्याचेकडुन ५३,३००/- किं.चे ३ पिस्टल, १ रिवॉल्वर व ३३ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आले.आहेत.

**सदर गुन्हयात एकुण ३२७,७९,९७,०००/- रुपये (३२७ करोड ७९ लाख ९७ हजार रुपये) किंमतीचा एम.डी. (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ, एम.डी बनविण्यासाठी लागणारे केमिकल्स, साहीत्य, ३ पिस्टल, १ रिवॉल्वर व ३३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले आहे.**

सदरची कामगीरी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री श्रीकांत पाठक, अतिरिक्त पोलीस आयुक्त, श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्री. मदन बल्लाळ, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील पो.नि./अविराज कुराडे, स.पो.नि./प्रशांत गांगुर्डे, पुष्पराज सुर्वे, पोउपनिरी./राजु तांबे, सहा.पो.उपनिरी /संदीप शिंदे, पोहवा/संजय शिंदे, संतोष लांडगे, अविनाश गर्जे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, सचिन सावंत, सचिन हुले, समीर यादव, सुधीर खोत, विकास राजपुत, पोअं/प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी, सौरभ इंगळे, गौरव बारी, धिरज मेंगाणे, मसुब किरण असवले व सफौ/संतोष चव्हाण (सायबर गुन्हे) यांनी केली असून सदर गुन्हयाचा तपास सपोनि/गांगुर्डे करीत आहेत.

---------oooo------------